सोलापूर विद्यापीठ

।। विद्यया संपन्नता ।।

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## शोध समिती

## कुलगुरुपदासाठी अर्ज मागवीत आहे

महाराष्ट्र शासनाने २००४ मध्ये स्थापन केलेले सोलापूर विद्यापीठ हे मुक्त उच्च शिक्षण पद्धती अंतर्गत आधुनिक दळणवळण तंत्रज्ञानाचा वापर करून पदविका, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील तांत्रिक, व्यावसायिक, पेशाविषयक व प्रागतिक शिक्षण कार्यक्रम देऊ करणारी उच्च अध्ययनाची संस्था आहे. सोलापूर शहराजवळील ५१७ एकरांच्या विस्तीर्ण जागेत विद्यापीठ क्षेत्र वसले असून, उच्च शिक्षण घेण्यासाठी व संशोधन करण्यासाठी हितावह असलेले उत्कृष्ट पायाभूत घटक आणि सुविधा यांनी ते युक्त आहे. विद्यापीठात चार प्रमुख विद्याशाखा आहेतः विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास आणि १८ पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह ६ संकुले आहेत.

अल्पावधीत या विद्यापीठाने उच्च शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक श्रेष्ठता प्राप्त केली आहे आणि उदयोन्मुख क्षेत्रात उच्च दर्जाचे संशोधन केले आहे. पाठ्यक्रमात सुधारणा करणे व विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करणे यासाठीच्या उत्तम पद्धतींचा येथे अवलंब केला जातो. विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रातील १०९ महाविद्यालये (अनुदानित व विनाअनुदानित दोन्ही) या विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठाचा परिचय व संबंधित माहिती त्यांच्या संकेतस्थळावर **http://su.digitaluniversity.ac** उपलब्ध आहे.

विद्यापीठाच्या माननीय कुलपतींनी (महाराष्ट्राचे परमश्रेष्ठ राज्यपाल) रिक्त असलेल्या कुलगुरुपदासाठी योग्य नावांची शिफारस करण्याकरिता त्रिस्तरीय शोध समिती स्थापन केली आहे.

ही शोध समिती आता प्रशासकीय कार्यक्षमता आणि नेतृत्त्व गुण असलेल्या ख्यातनाम विद्यैकनिष्ठ व्यक्तींकडून अर्ज मागवीत आहे. उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन द्वारा निर्गमित २७/०५/२००९ दिनांकित आदेशासोबत वाचावयाच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ११ मध्ये कुलगुरु पदासाठीची आवश्यक अर्हता आणि अन्य आवश्यक बाबी नमूद केल्या आहेत. त्याचे तपशील वेबसाईटवरून घेता येतील. कुलगुरु पदाचा पदावधी पाच (०५) वर्षांचा किंवा त्यांच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी लवकर घडणाऱ्या कालावधीपर्यंत असेल आणि त्या/ते पुनर्नियुक्तीस पात्र राहणार नाहीत.

आवश्यक बाबींची पूर्तता करणाऱ्या इच्छूक व्यक्तींनी आपल्या उमेदवारीचे दोन पानी समर्थन, विद्यापीठाबाबत भावी कल्पनेचे दोन पानी निवेदन आणि त्यांच्या कामाशी सुपरिचित असलेल्या तीन असामान्य व्यक्तींची नावे व संपर्काचे तपशील यांसह संशोधन, अध्यापन व प्रशासन क्षेत्रातील अनुभव/ कामगिरी स्पष्टपणे नमूद करून विहित नमुन्यात सविस्तर स्वपरिचय देऊन अर्ज करावा. अग्रगण्य विद्यापीठे/ संस्था सुद्धा समितीच्या विचारार्थ योग्य व्यक्तींची नावे सुचवू शकतात.

शोध समितीने **नोडल ऑफिसर म्हणून श्री. पिनाकी नंदन पटनाईक** यांची नेमणूक केली आहे. त्यांचा पत्ता, ई-मेल आणि दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत- **हेड, सेन्टर फॉर मॅनेजमेंट स्टडीज, एनएएलएसएआर युनिव्हर्सिटी ऑफ लॉ, जस्टीस सिटी, शमीरपेठ, हैदराबाद-५००१०१, तेलंगणा राज्य. ई-मेल pattnaikp@nalsar.ac.in मोबाईलः (+९१) ९९३७०१७३७८.**

अर्ज/ नामांकने ०२ फेब्रुवारी, २०१८ रोजी किंवा पूर्वी पोहोचतील अशा रितीने टपालाने/ कुरिअरद्वारा नोडल ऑफिसरकडे पाठवावीत. त्यानंतर पोहोचलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. नोडल ऑफिसरकडे अर्जाची सॉफ्ट कॉपीसुद्धा पाठवता येईल. तथापि, पाठोपाठ अर्जाची हार्ड कॉपी पाठवावी लागेल. अल्प सूचिबद्ध उमेदवारांना समिती सदस्यांबरोबर व्यक्तिशः संवादासाठी आमंत्रित केले जाईल.

**- अध्यक्ष**

दिनांक ०१ जानेवारी, २०१८ **शोध समिती**